# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र. ४६८ दिनांक २४/०५/२०२०

## कासा पोलीस ठाणे यांचेकडुन तंबाखुजन्य पदार्थांची वाहतुक करणा-या आरोपीतांना जेरबंद करुन २७,४९,३६८/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

दि.२३/०५/२०२० रोजी पहाटे ०३.३० वाजता कासा पोलीसठाणे हद्दीतील चारोटी टोल नाक्याच्या पुढे सुकन्या हॉटेलच्या समोर यातील आरोपीत १)ओमप्रकाश श्रीहजारी यादव, वय -२८ वर्षे, रा.द्वारा, हजारी यादव,ग्राम-खम्हौली, पो.लसडा खुर्द ठेमका उत्तर प्रदेश, २)राजु राजकुमार यादव, वय २५वर्षे,रा.द्वारा, हजारी यादव, ग्राम-खम्हौली, पो.लसडा खुर्द ठेमका उत्तर प्रदेश, ३) गौरव सिंघाल रा. उल्हासनगर नं. ५, ४) दिपेशभाई पुर्ण नांव व पत्ता माहीती नाही यांनी आपसात संगणमत करुन आयशर टेंम्पो क्रमांक एम.एच.०५/ डी.के. ४२५४ मध्ये तंबाखुजन्य पदार्थाचा माल हा मानवी आरोग्यास अपायकारक आहे व त्यावर महाराष्ट्र शासनाने अधिसुचनेद्वारे साठा/ वितरण/ विक्री/ उत्पादन व वाहतुक करण्यास प्रतिबंध केलेला हे त्यांना माहीत असतांनाही त्यांनी शासकीय आदेशाची अवहेलना करुन तो माल कडोदरा, सचिन गोडाऊन सुरत येथुन भरुन कपडयाचे मालाचे गोण्यांचे खाली ठेवुन अवैध्य रित्या वाहतुक करीत असतांना मिळुन आले. आरोपीत यांचे ताब्यातुन १) ३,९२,०४०/-रु किं. विमल पान मसाल्याचे १९८० पॅकेट प्रत्येकी पॅकेट २) ७४,८००/- रु. किं. विमल पान मसाला ४०० पॅकेट ३) १९,३६०/-रु. किं व्हि. १ तंबाखुचे (छोटा पॅकेट) ८८० पॅकेट ४) ३९,६००/- रु. किं. व्हि. १ तंबाखुचे (मोठा पॅकेट) ७९२ पॅकेट ५) २,३०,४००/- रु. किं. आर.एम.डी. पान मसालाचे ३२० बॉक्स प्रत्येकी बॉक्स ची किंमत ७२०/- रु. किंमतीचे ६) ९६,०००/- रु. किं. एम. सेंन्टेड तंबाखु चे ३२० बॉक्स ७) ६,००,०००/- रु. किं आयसर कंपनीचा टेम्पो क्र.एम.एच. ०५/डी.के.४२५४ किं.सु. ८) १२,९७,१६८/- रु. किं. गोण्यांमध्ये असलेला कपडयाचा माल असा एकुण २७,४९,३६८/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत यांचे विरुध्द कासा पोलीस ठाणे गु.र.नं. I ९२/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३२८, २७२, २७३, १८८, ३४ सह अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ चे व त्याखाली नियम व विनीमय अंतर्गत कायदा २६ (२) (i) सहवाचक कलम २७ (३) (e) व कलम ३ (१) (zz) (६) सहवाचक कलम २६ (२) (iv), ३० (२) (a) सह वाचक नियम २.३.४.( Prohibition & restriction on sale) ३.१.७ (substances added to food ) व कलम ५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयातील आरोपीत यांना दिनांक २३/०५/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे

सदरची कारवाई सहा.पोलीस निरीक्षक श्रीमती. सिध्दवा जायभाये, कासा पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली कासा पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned by CamScanner